नवप्रभा
मंगळवार दि. ३१ मार्च २०१५

# जैवविविधतेचे संवर्धन करणे प्रत्येकाची जबाबदारी : डॉ. बाचूळकर

दोडामार्ग

विकासाच्या नावाखाली अमाप जंगल तोड, नैसर्गिक अधिवास नष्ट केले जात आहेत. पर्यावरणातील प्रत्येक घटक हा मानवी उत्क्रांतीसाठी महत्वपूर्ण असतो. म्हणून त्यांचे संवर्धन करणे ही प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे, असे मत विजयसिंह यादव महाविद्यालयाचे प्राचार्य व माधव गाडगीळ समितीचे सदस्य डॉ. मधुकर बाचुळकर यांनी मांडले. ते दोडामार्ग येथील लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयात 'पश्चिम घाट जागतिक वारसा : पर्यावरण आणि विकास' या विषयावर आयोजित केलेल्या दोन दिवशीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या समारोप समारंभात प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. आर. बी. पाटील हे होते. डॉ. बाचुळकर पुढे म्हणाले की, जगातील फक्त २०% जैवविविधतेचा आजपर्यंत शोध लागला आहे. तर ८०% जैवविविधता अजूनही विज्ञानाच्या दृष्टीक्षेपात आलेली नाही.